॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या देशभरातील (नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेम वर्क ) शैक्षणिक संस्थांच्या मानांकनात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अनुदानित राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या गटात ५१ ते १०० या क्रमाकांत स्थान प्राप्त केले आहे.

सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी केंद्रीय मंत्रालयाने देशातील १०हजार ८४५ उच्च शिक्षण संस्थांची श्रेणी जाहीर केली. याक्रमवारीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने भारतातील ५१ ते १०० सर्वोच्च सार्वजनिक अनुदानित राज्य विद्यापीठांच्या गटात स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा खोवला गेला आहे. दरवर्षी एनआयआरएफ रँकिंग जाहीर केली जात असते. यामध्ये अध्ययन, अध्यापन, संसाधने, संशोधन, परीक्षांचे निकाल, समावेशकता आदी निकषांचा विचार केला जातो. कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने गेल्या दोन वर्षात अध्ययन, अध्यापन, संशोधन तसेच विविध सुविधा यामध्ये भरीव वाटचाल केली आहे. आशियातील सर्वोत्कृष्ट ३० टक्के क्रमवारीत विद्यापीठाला यापुर्वी स्थान मिळाले आहे. याशिवाय प्रतिष्ठीत इंग्रजी नियतकालिकाने महिनाभरा पुर्वी केलेल्या सर्वेक्षणात भारतातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठासाठी बहुविद्याशाखीय विद्यापीठ गटात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला ५० वे तर पश्चिम विभागीय विद्यापीठाच्या गटात ९ वे स्थान प्राप्त केले आहे. आता एनआयआरएफ च्या रँकिंगमध्ये विद्यापीठाला स्थान मिळाल्यामुळे विद्यापीठाचे वेगळेपण अधारेखित झाले आहे. विद्यार्थी संख्या, शैक्षणिक संसांधने, शोधनिबंध, पेटंट, संशोधन प्रकल्प तसेच विद्यार्थ्यांना प्राप्त होणारी प्लेसमेंट यामध्ये विद्यापीठाने आघाडी घेतली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : परंपरा, निसर्ग, स्त्रियांचे जगणे यावर भाष्य करीत अहिराणी भाषेत तसेच भारूड आणि गेय कविताद्वारे बहिणाबाईंच्या कवितांशी नाते सांगत सादर होणाऱ्या कवितांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त अयोजित कविसंमेलन चांगलेच रंगले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती आणि नामविस्तार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेतील बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्यावतीने मंगळवार दि. १३ ऑगस्ट रोजी बहिणाबाईंच्या कवितेतील सौंदर्य आणि सादरीकरण या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आंबाजोगाई येथील अविनाश भारती, जळगाव येथील प्रा. संध्या महाजन आणि म्हसावद येथील विमल वाणी यांनी कवितांचे सादरीकरण केले. वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक तथा व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. म.सु. पगारे अध्यक्षस्थानी होते. विमल वाणी यांनी अहिराणी भाषेतील 'आमी भारतन्या नारी घेसी गगन ना भरारी' ही कविता तसेच 'आता वेगळं निघायचं राया, आपण वेगळ निघायचं राया' हे भारूड सादर करून स्त्री सुलभ भावना व्यक्त केल्या. प्रा. संध्या महाजन यांनी 'माय बहिणाई कशी तुनी करामत , शेतकऱ्याच्या भाषेले नेलं विद्येच्या पीठात ही कविता गाऊन दाखविली. बहिणाबाईंच्या अक्षर पेरणीने मराठीचे साहित्यशिवार हिरवे झाले' अशी भावना संध्या महाजन यांनी व्यक्त केली. अविनाश भारती यांच्या कविता सादरीकरणाला प्रचंड प्रतिसादर मिळाला. 'गावकुसाचा हाका येती, जीवन झाले ओझे गं' आणि 'तुझ्या नाजुक हातात, सखे चुडाही नाजुक, माझी नजर भावुक, त्याले सगळे ठाऊक' ही गेय कविता सादर केली. बहिणाबाईंच्या कविता अनुभवातून आल्या असल्यामुळे जनसामान्यांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. असे अविनाश भारती यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा.म.सु. पगारे यांनी जगण्याच्या तत्त्वज्ञानावर दोन ओळींमध्ये बहिणाबाईंचे भाष्य प्रेरणा देणारे असल्याचे सांगून जगभर बहिणाबाई यांच्या कविता सर्वांसाठी प्रेरक ठरल्या आहेत, असे मत मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बहिणाबाई अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. नितीन बडगुजर यांनी केले. नेत्रा उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. गौरव हरताळे यांनी आभार मानले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातंर्गत संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरीता ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

बऱ्याच विद्यार्थी/विद्यार्थिंनी यांचेकडून अति पर्जन्यवृष्टी झाल्याने तसेच शुल्क भरण्यासाठी पैसे नसल्याचे कारण देवून महाविद्यालयात प्रवेश मिळणेबाबत प्राचार्यांकडे विनंती केली जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विद्यापीठाने संलग्ननित महाविद्यालय / परिसंस्था आणि शैक्षणिक प्रशाळा यामध्ये विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता यापुर्वी दिलेली १० ऑगस्ट पर्यंतची मुदतवाढ आता ३१ ऑगस्टपर्यंत वाढवून देण्यात आली आहे. प्रवेशापासून वंचीत असलेल्या विद्यार्थी/ विद्यार्थिंनींनी महाविद्यालयामध्ये जाऊन प्रवेश घ्यावेत असे आवाहन विद्यापीठाने परिपत्रकान्वये केले आहे.

..................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ ऑगस्ट, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी